पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

माजी विद्यार्थी संघ

## रक्तदान शिबिर अहवाल

## 2021-2022

भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष व महाविद्यालयाच्या रोप्यमहोत्सवी वर्षा निमित्ताने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व युवा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी संघ व शिक्षक परिषद फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 13 जानेवारी 2022 रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे आयोजन श्री संस्थान मारुती मंदिर, फुलंब्री येथे करण्यात आले तर रक्तसंकलन शासकीय रक्तपेढी, शासकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांच्या वतीने करण्यात आले.

रक्तदान शिबिरात अधिकाधिक लोकांनी सहभागी व्हावेयासाठी विविध व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून रक्तदान शिबिराची माहिती देणारे पत्र लोकांपर्यंत पोहोचवण्यात आले. फुलंब्री तालुक्यातील शिक्षक, व्यापारी, माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी यांना व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून रक्तदान शिबिराची माहिती देण्यात आली.

दिनांक 13 जानेवारी 2022 रोजी रक्तदान शिबिराचे उद्धाटन डॉ. सर्जेराव ठोंबरे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करीत असताना ते म्हणाले की, समाज हा शिक्षकांचे अनुकरण करीत असतो, त्यामुळे शिक्षक व माजी विद्यार्थी यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याने इतरांना सुद्धा यातून प्रेरणा मिळेल. कोविड-19 या महामारीत सर्वच रुग्णालयामध्ये रक्ताची गरज वाढलेली असताना, रक्तदान शिबिराचे आयोजन समाजासाठी उपयुक्त ठरेल. शासकीय रुग्णालयामध्ये येणारे रुग्ण हे समाजातील गरीब घटकातील असल्यामुळे, शासकीय रक्तपेढीच्या माध्यमातून करण्यात येणारे रक्त संकलन हे समाजातील अत्यंत गरजू लोकांपर्यंत पोहोचेल.

शासकीय रक्तपेढीच्या श्री सुनिता बनकर यांनी यावेळी रक्तदानाचे महत्त्व सांगितले. तसेच एक रक्तदाता तिघांचे प्राण कसे वाचवू शकतो हे सुद्धा स्पष्ट केले. यावेळी शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष बाबुराव गाडेकर यांनीसुद्धा मार्गदर्शन केले.

रक्तदान शिबिराच्या उद्धाटन कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर. टकले, फुलंब्री तहसीलचे नायब तहसीलदार श्री. अशोक कापसे महाविद्यालयाचे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रक्तदान शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जगन ढोके यांनी, प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी, तर आभार माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री अनिल दुतोंडे यांनी मानले.

रक्तदान शिबिरात फुलंब्री तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशालेच्या विविध शाळेतील शिक्षक, फुलंब्री गावातील व्यापारी संघाचे सदस्य व अन्य व्यापारी, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. रक्तदान शिबिरात अनेक जण उत्साहाने सहभागी झाले. काही जणांना कमी वजनामुळे तसेच उपवासामुळे रक्तदान करता आले नाही, अशा लोकांची समजूत घालून नाराजी दूर करण्यात आली. शिबिरात एकूण 47 जणांना रक्तदान करता आले.

समन्वयक माजी विद्यार्थी संघ
प्रा. डॉ पी.एम.कल्याणकर

## रक्तदान शिबिरातील फोटो



**फित कापून रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. सर्जेराव ठोंबरे व श्री बाबुराव गाडेकर, फुलंब्री तालुक्यातील शिक्षक, ग्रामस्थ, व्यापारी ,माजी विद्यार्थी.**



**उद्घाटन सत्रात प्रतिमेचे पूजन करताना मान्यवर.**




शिबिराच्या उद्धघाटन सत्राचे सूत्रसंचालन करताना श्री जगन ढोके ( शिक्षक परिषद, फुलंब्री)



रक्तदान शिबिराच्या उद्धघाटनसत्रास उपस्थिती.




**रक्तदानशिबिराचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. कल्याणकर पी. एम.**




**उपस्थितांना रक्तदानाचे महत्त्व सांगताना शासकीय रक्तपेढीच्या सुनिता बनकर.**




उपस्थितांना मार्गदर्शन करताना राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष बाबुराव गाडेकर.




उद्धघाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना मा. डॉ. सर्जेराव ठोंबरे.




उद्घघाटनसत्राचे आभार मानताना श्री. अनिल दुतोंडे (अध्यक्ष माजी विद्यार्थी संघ.)



रक्तदान शिबिरात रक्तदान करताना माजी विद्यार्थी बाबासाहेब लहाने, शिक्षक व व्यापारी व उपस्थित मान्यवर.



रक्तदान शिबिरात रक्तदान करताना माजी विद्यार्थी बाबासाहेब लहाने, शिक्षक व व्यापारी व उपस्थित मान्यवर.




रक्तदान शिबिरात रक्तदान करताना फुलंब्री तालुक्यातील शिक्षक.




रक्तदान शिबिरात रक्तदान करताना तालुक्यातील शिक्षिका व महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. राजश्री पवार.




रक्तदान करताना माजी विद्यार्थी श्री अनिल जाधव, व्यापारी व शिक्षक.




रक्तदान शिबिरात रक्तदान करताना फुलंब्रीतील व्यापारी.




शिबिरात रक्तदान करताना फुलंब्री तालुक्यातील शिक्षक.




रक्तदान शिबिरात रक्तदान करताना माजी विद्यार्थी श्री संतोष होनमाळी व फुलंब्री तालुक्यातील व्यापारी




रक्तदान शिबिरात रक्तदान करताना कु. पूजा पाटणी




शिबिरात रक्तदान करताना माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री अनिल दुतोंडे,  श्री जगन ढोके व शिक्षक.




**शिबिरात रक्तदान करताना फुलंब्री तालुक्यातील शिक्षक.**



शिबिरात रक्तदान करताना श्री जगन ढोके (शिक्षक परिषद फुलंब्री) व तालुक्यातील शिक्षक.



रक्तदान शिबिरात रक्तदान केल्यानंतर प्रमाणपत्रासहित रक्तदाते

## रक्तदान शिबिराची वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी.

सकाळ



फुलंब्री : रक्तदानप्रसंगी उपस्थित मान्यवर. (छायाचित्र : नवनाथ इधाटे)

# फुलंब्रीत ८७ दात्यांचे रक्तदान

**फुलंब्री, ता. १४ (बातमीदार)** : महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व माजी विद्यार्थी संघ श्री संत सावतामाळी ग्रामीण महाविद्यालय यांच्यावतीने राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख व युगपुरुष स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून आणि भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त फुलंब्री येथे जुने मारुती मंदिरात भव्य रक्तदान शिबिर गुरुवारी (ता.१४) पार पाडले.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे विश्वस्त सर्जेराव ठोंबरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष बाबुराव गाडेकर, नायब तहसीलदार कापसे, मुख्याधिकारी नंदा गायकवाड, प्राचार्य आर एस टकले, शासकीय रक्तपेढीच्या सुनीता [illegible], दिलीप गोरे , चंद्रकांत मुगले, राजाराम तीळवणे, शरद चव्हाण, अशोक निकम, सर्जेराव जाधव, सुधाकर तरटे, पतसंस्था संचालक अय्युब पटेल, आबा पाटील, चंदुलाल गवळे, दिलीप वाघोले, निर्मला कोल्हाडे, व्याखाते लक्ष्मीकांत कोलते यांच्या प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिबिरात ८७ रक्तदाते पात्र ठरले. सूत्रसंचालन जगन ढोके यांनी केले, प्रास्ताविक पांडुरंग कल्याणकर यांनी तर आभार अनिल दुतोंडे यांनी मानले. शिबिरासाठी संतोष जाधव, आप्पासाहेब चव्हाण, ज्ञानेश्वर मोरे, उदय राठोड, कल्याण जाधव, गणेश करपे, प्रवीण गायकवाड, भगवान भुजंग, संजय प्रसाद, अनिल दाभाडे, करामत खान, शितल शेळके, रेखा शिंदे, शारदा बोलकर, राधा मांनटे, अश्विनी पवार, राजश्री पवार, दिव्या पाटणी, संध्या बनसोडे,-सनी पाटणी, रवींद्र बावस्कर, रामेश्वर राखुंडे, संतोष होनमाळी, अन्सार शहा, पांडुरंग पवार, प्रितेश सुरडकर, सोमिनाथ जाधव आर्दीनी सहकार्य केले

Navnath Idhate

Navnath Idhate and 5 others

Aurangabad, District-Today
15/01/2022 Page No. 3